# भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(दुपार)

जा.क्र. ६५६/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांकः–०८/१०/२०१६

**१) चाकुने दुखापत करुन जिवाने मारण्याची धमकी दिल्याने गुन्हा नोंद . :–**

दिनांक ०६/१०/२०१६ रोजी २१.०० वा. दर. यातील फिर्यादीचे मालकाचे गोल्डन लॉटरी दुकानात लॉटरी गेम खेळण्यास आरोपी हा गेला व फिर्यादीस तुझ्या मालकांचे २९,०००/–रु. माझेवर उधारी आहेत. कुठे गेला तुझा मालक असे बोलुन फिर्यादी सोबत भांडण करुन दुकानातील दोन कॅम्पुटर फोडुन नुकसान केली व चाकुने फिर्यादीचे डावे हाताचे कोणीजवळ मारुन दुखापत केली फिर्यादी व मालकास शिविगाळ करुन जिवाने मारण्या पिटण्याची धमकी दिली. असे फिर्यादी मंगेश एकनाथ शामरुतकर वय ३३ वर्ष, रा. पेट्रोल पंप ठाणा यांचे व डॉ. रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन जवाहरनगर येथे कलम ३२४,४२७,५०४,५०६ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. साखरे पो.स्टे. जवाहरनगर हे करीत आहेत.

**२) महीलेचा विनयभंग केल्याने गुन्हा नोंद . :–**

दिनांक २०१५ ते आज पर्यत. यातील आरोपी हा फिर्यादीचे खाजगी दवाखाण्यात कंमपाउंडरचे काम करीत होता व फिर्यादीचे घरी नेहमी येणे जाणे करीत होता. फिर्यादीने आरोपीला कामावरुन काढल्याने आरोपीने आपले मोबाईलवरुन फिर्यादी व तिचे आई वडीलाचे मोबाईलवर अश्लिल शब्दात शिविगाळ करुन जिवाने मारण्याची धमकी देवुन लपुन पाठलाग, अश्लिल चाळे करुन विनयभंग केल्याने फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन जवाहरनगर येथे कलम ३५४ड(१)(३),५०४,५०६ भांदवि. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. बागडे पो. स्टे. जवाहरनगर हे करीत आहेत.

**३) जागेच्या वादावरुन भांडण व शिविगाळ करुन जिवाने मारण्याची धमकी दिली. :–**

दिनांक १४/०९/२०१६ रोजी १३.०० वा. दर. यातील फिर्यादी चेतन चिंधुजी लिल्हारे वय ६९ वर्ष रा. सिरसोली हे घराशेजारी गुलाब बंधाटे यांचे चाहापाण्याच्या दुकानात बसला असतांना यातील आरोपी हा तेथे येवुन फिर्यादीस तु आमच्या वाडीतील भेंडया तोडुन आई सोबत भांडन केल्याने व जागेच्या कारणावरून थापड बुक्यांनी विटाच्या तुकडयाने पोटावर, छातीवर व डावे कुशीवर मारून गंभिर दुखापत करून शिविगाळ व जिवाने मारण्या पिटण्याची धमकी दिल्याने जखमी फिर्यादीचे बयान व डॉ. रिपोर्ट वरून व चौकसी अहवालावरून पोलीस स्टेशन आंधळगाव येथे कलम ३२५,३२३,५०४,५०६ भांदवि. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास सपोनि. उईके पो. स्टे. आंधळगाव हे करीत आहेत.

**४) मोटार सायकलच्या धडकेत जखमी होवुन मुलीचा उपचारा दरम्यान मृत्यु . :–**

दिनांक ०५/०९/२०१६ रोजी १०.३० वा. दर. यातील फिर्यादी व मृतक कु. रूपाली राजु पुसाम वय २२ वर्ष रा. वडेगाव हे दोंन्ही डिस्कव्हर मोटार सायकल क्र. एमएच ३६/०२७१ ने गडेगाव येथुन एनएच ०६ रोडने जात असता दोघेही लाखनी कोर्ट समोरील झेब्रा क्रासिंग वरून दक्षिणे कडुन उत्तरेकडे रोड ओलांडीत असतांनी यातील अज्ञात आरोपी मोटार सायकल चालकाने आपले ताब्यातील मोटार सायकल हयगयीने व भरधाव वेगाने चालवुन फिर्यादीचे मोटार सायकल ला धडक दिल्याने कु. दिपाली हीला जखमी करून पळुन गेला व उपचारादम्यान ती मेडीकल कॉलेज नागपुर येथे मरण पावल्याने फिर्यादी विकास भावराव पुसाम वय २३ वर्ष रा. गोरेगाव साकोली यांचे तोंडी व पो.स्टे. अजनी नागपुर येथे मर्ग क्र. ००/१६ कलम १७४ जाफौ चे कागदपत्रा वरून पोलीस स्टेशन लाखनी येथे कलम ३०४(अ),२७९ भांदवि. सहकलम १८४,१३४(ब) मोवाका. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास सपोनि. कुरील पो. स्टे. लाखनी हे करीत आहेत.

५) मोटार वाहन कायद्याखाली कारवाई. :—

दिनांक ०७/१०/२०१६ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायद्याखाली १२१ प्रकरणांची नोंद कण्यात आलेली असून त्यापैकी अवैध प्रवासी ०१ केसेस, तिन सिटर वाहनांवरती १९ केसेस व ईतर वाहनांवरती १०१ केसेस करण्यात आलेल्या आहेत.

(बी. आर. गाडे)
प्रभारी पोलीस उपअधिक्षक(गृह)
भंडारा करीता
दुरध्वनी.क्र. ८८०५१०१११२

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.